# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/04/2023 (सोमवार) दुपार


---

## दुखापत

**१) पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत गुमथळा येथे दिनांक ०९/०४/२०२३ चे १५/०० वा. ते १५/३० वा. सुमारास फिर्यादी नामे- सौ. वंदना सिद्धार्थ बोरकर, वय ३८ वर्ष, रा. गुमथळा ता. कामठी ही आपल्या घरीच हजर असताना फिर्यादीचे पती सिद्धार्थ बोरकर हे दारु पिण्याकरीता घरातील धान्य काढुन विकण्याकरीता जात असताना फिर्यादी आपल्या पतीला घरातील गहु विकु नका असे म्हटले असता त्यांनी फिर्यादी सोबत झगडा भांडण व शिवीगाळी करून फिर्यादीला दाढी करण्याच्या ब्लेडनी उजव्या हाताचे दंडाला चिरा मारला व रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांदेवार ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :- अंतर्गत ०२ किमी अंतरावर चिचपुरा सावनेर येथे दिनांक ०८/०४/२०२३ चे २२/०० वा. सुमारास फिर्यादी नामे- राजेश नत्थुजी शेंडे, वय ५२ वर्ष, रा. वार्ड क्र. १४ चिचपुरा सावनेर व आरोपी नामे- रीतीक राजेश शेंडे रा. वार्ड क्र. १४ चिचपुरा सावनेर हे वडील मुलगा असुन घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी आरोपीच्या घरी आपले राशन कार्ड घेण्या करीता गेला असता आरोपीने फिर्यादी सोबत शाब्दीक वादविवाद केला शिवीगाळ करून काठीने डाव्या हातावर मारहाण केली व जखमी केल्याने डाव्या हाताच्या अंगठयाजवळ मार लागुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे मो. नं. ७९७२४३१२३८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा घोगरा येथे दिनांक ०८/०४/२०२३ चे २०/३० वा. ते २१/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिलीप चिंधबाजी राऊत, वय ५६ वर्ष, रा. घोगरा ता. नरखेड याचा मोठा मुलगा आशिष वय २५ वर्ष हा मामाच्या घरी जातो असे सांगुन घरून निघुन गेला काही वेळाने नंतर यातील नमुद आरोपीने फिर्यादीच्या मुलाला घरी आणुन सोडले तेव्हा मुलाला डोक्याला मागील बाजुस मार लागुन रक्त निघाल्याचे दिसले मुलाने काही सांगितले नाही तेव्हा फिर्यादीने आरोपीस विचारले की ''मुलगा आशिष ला कोणी मारले'' तेव्हा आरोपीने मीच आशिष ला मारले असुन तुमच्याने जे होते ते करून दाखवा असे सांगुन घरी निघुन गेला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रजोक तायडे मो. नं. ८३८९६४७१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**